**(ANNEXURE - 1)**

HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT RESOLUTION NO. USG 2009/(165/09)/WS-2 DATED 27.3 2012

**महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठासाठी समान लेखा संहिता (Common Account Code) लागू करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक:युएसजी २००९/(१६५/०९)/विशि-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २७ मार्च, २०१२

**प्रस्तावनाः**

लेख्यासंबंधीची तत्वे जरी समान असली तरी विविध अकृषी विद्यापीठात भिन्न स्वरुपाची कार्यपद्धती अवलंबण्यात येते. यासाठी सर्व अकृषी विद्यापीठामध्ये लेख्यासंबंधीची एकच व समान कार्यपद्धती असणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील सर्व वित्त व लेखा अधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली. प्रथम बैठकीत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी लेखा संहीता तयार करुन त्यामध्ये आवशक त्या दुरुस्ती करुन सर्व अकृषी विद्यापीठासाठी अंतिम लेखा संहिता तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सर्व अकृषी विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या सूचना तसेच अभिप्राय विचारात घेऊन लेखा संहीतेचे अंतिम प्रारुप संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी शासनास सादर केले. सदर प्रारुपास वित्त विभागाची तसेच शासनाची मान्यता घेऊन पुस्तक स्वरुपात प्रसिद्ध करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेतील बाबी विचारात घेऊन राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठासाठी दिनांक ०१ एप्रिल, २०१२ पासून समान लेखा संहिता (Common Account Code) लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर लेखा संहीतेच्या नियमावलीची पुस्तिका सोबत पाठविण्यात येत आहे. दिनांक ०१ एप्रिल, २०१२ पासून सदर लेखा संहिता राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठास लागू करण्यात येत आहे. या लेखा संहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संचालक, उच्च शिक्षण, पुणे, सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण तसेच वित्त व लेखा अधिकारी, सर्व अकृषी विद्यापीठे यांची राहील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २३९/११/कोषाप्र-५, दिनांक २५.१०.२०११ अन्वये लेखा संहितेच्या प्रस्तावास दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२०३२७०९५९५२३५२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रा. गो. जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हील, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

C:\Documents and Settings\df\My Documents\Nilima\NOTE\165 09 Accounts Code doc/5

सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ((पुस्तकाच्या प्रत्येकी २ प्रती)

सर्व अकृषी विद्यापीठे ((पुस्तकाच्या प्रत्येकी २ प्रती)

महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२ महाराष्ट्र, मुंबई / नागपूर ((पुस्तकाच्या प्रत्येकी २ प्रती)

महालेखापाल, (लेखा परीक्षण) -१/२ महाराष्ट्र, मुंबई / नागपूर ((पुस्तकाच्या प्रत्येकी २ प्रती)

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी ((पुस्तकाच्या प्रत्येकी २ प्रती)

अधिदान व लेखा अधिकारी , बांद्रा (पूर्व), मुंबई ((पुस्तकाच्या २ प्रती)

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ((पुस्तकाच्या २ प्रती)

नियोजन विभाग, (का-१४७१) मंत्रालय, मुंबई. ((पुस्तकाची १ प्रत)

वित्त विभाग,(कोषाप्र-५/ व्यय-५/अर्थसंकल्प-३/ अर्थसंकल्प-८) मंत्रालय, मुंबई. ( पुस्तकाची प्रत्येकी १ प्रत)

मा. प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई (पुस्तकाची १ प्रत)

सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई (पुस्तकाची प्रत्येकी १ प्रत)

उप सचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई (पुस्तकाची १ प्रत)

कार्यासन अधिकारी, (साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,( पुस्तकाची १ प्रत)

निवड नस्ती (विशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, (पुस्तकाची १ प्रत)

C:\Documents and Settings\df\My Documents\Nilima\NOTE\165.09 Accounts Code doc/6